# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबई विद्यापीठातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात वसतीगृहे बांधण्याबाबतचा घेतलेला निर्णय

**(१) ११५१ (२२-१२-२०१४). श्री. अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात अनुसूचित जातींच्या १०० मुलांसाठी आणि ९६ मुलींसाठी दोन वसतीगृहे बांधण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाकडून १.९२ आणि १.८० कोटीचे अनुदान मिळाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वसतिगृहांच्या बांधकामाची सुरुवात झाली आहे काय, असल्यास, किती कालावधीत बांधकाम पूर्ण होणे अपेक्षित व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (१९-०३-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) वसतीगृहाच्या बांधकामास अद्याप सुरुवात झालेली नाही सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाकडून दि. २८/०४/२०१४ च्या आदेशान्वये अनुसूचित जातीच्या मुलांच्या दोन वसतीगृहांसाठी बाबू जगजीवनराम छात्रावास योजनेंअंतर्गत रु. १.८० कोटी व दि. २९.०४.२०१४ च्या आदेशान्वये अनुसूचित जातीच्या मुलींच्या दोन वसतीगृहातील रु. १.९२ कोटी इतका निधी प्राप्त झालेला आहे, या वसतीगृहाच्या बांधकामाचे सविस्तर नकाशे प्राप्त होताच बांधकाम परवानासाठी महानगरपालिकेत प्रस्ताव दाखल करण्यात येईल. बाधकाम परवाना प्राप्त होताच वसतीगृहात बांधकामास सुरुवात करण्यात येईल.

---

### मुंबई उपनगरातील मागोठणे येथील वन जमीनीवरील झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(२) २४२५ (२३-१२-२०१४). श्री. प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वन जमिनीवरील इमारतींना मान्यता देण्यासंदर्भात शासनाने धोरण तयार केले आहे काय,

(२) असल्यास, या धोरणानुसार मुंबई उपनगरातील मागोठणे मतदार संघातील वन जमीनीवरील सन १९९५ पूर्वीच्या चाळी, वस्त्या व झोपडयांना मान्यता दिली आहे काय,
(३) असल्यास, त्याचप्रमाणे सन २००० पूर्वीच्या झोपडयांनाही मान्यता देण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(४) तसेच या वन जमिनीवरील १९९५ पूर्वीच्या पात्रा झोपडपट्टीधारकांना ७५०० /- रुपये भरुन चांदिवली येथे स्थलांतर केले होते हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यातील काही झोपडपट्टीधारक अशिक्षित व अज्ञानी असल्याने त्यांचा लाभ त्यांना मिळाला नाही खरे आहे काय,
(६) असल्यास, या झोपडपट्टीधारकांचे पुर्नवसन करण्याकरीता शासन कोणती कार्यवाही करीत आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०३-२०१५) :** (१) राज्यातील वन जमिनीवरील इमारतींना मान्यता देण्यासंदर्भात शासनाने वेगळ्याने कोणतेही धोरण तयार केलेले नाही.
(२) हे खरे नाही.
(३) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ नुसार ज्या वस्त्या गलिच्छ वस्त्या म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत, अशा वस्त्यांमधील १.१.१९९५ किंवा तत्पूर्वीच्या अतिक्रमकांचे पुनर्वसन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत त्याच ठिकाणी करण्याचे शासनाचे धोरण होते. त्यात सुधारणा करुन महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडून दि. २२.७.२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार १.१.१९९५ ऐवजी १.१.२००० रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या शासकीय, निमशासकीय व खाजगी जमिनींवरील घोषित तसेच गणनाकृत झोपड्यांत सध्या प्रत्यक्षात रहात असलेल्या झोपडीवासियांचा निवारा संरक्षित करण्यात आला आहे. तथापि संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील कोणतीही अतिक्रमित वस्ती गलिच्छ वस्ती म्हणून घोषीत करण्यात आलेली नाही. त्यामुळे सद्यःस्थितीत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनजमिनीवरील सन २००० पूर्वीच्या झोपड्यांना दि. २२.७.२०१४ रोजीचा शासन निर्णय लागू नाही.
(४) होय हे खरे आहे.
(५) व (६) रिट याचिका क्र. ३०५/९५ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि. १७/७/९९ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार रक्कम रु. ७०००/- भरण्यासाठी सन १९९९ ते २००८ या कालावधीत ८ वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतीत ज्या अतिक्रमकांनी रक्कम रु. ७०००/- भरले आहेत व जे अतिक्रमक पुनर्वसनासाठी पात्र आहेत, अशा अतिक्रमकांचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत उद्यानाबाहेर मौजे चांदिवली येथे पुनर्वसन करण्यात येत आहे.

---

**मुंबई उपनगरातील बोरीवली येथील नॅशनल पार्क येथे राहणा-या आदिवासी बांधवांच्या मुलांना खेळण्याकरिता मैदान उपलब्ध नसल्याबाबत**

**(३) २४२९ (२३-१२-२०१४). श्री. प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील बोरीवली येथील नॅशनल पार्क, केतीकी पाडा, जानुपाडा, लहूगड, दामूनगर येथे वर्षानुवर्षे राहणा-या आदिवासी बांधवांच्या मुलांना खेळण्याकरिता मैदान उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन या ठिकाणी मुलांकरिता मैदान उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०३-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) बोरीवली नॅशनल पार्कमधील केतकी पाडा, जानुपाडा, लहूगड, दामूनगर या अतिक्रमित वस्त्या आहेत. सदर जमिनी या वन जमिनी असल्याने या ठिकाणी खेळाचे उपलब्ध करुन देता येणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील मागोठाणे येथील अंगणवाडी व बालवाडींची झालेली दुरवस्था**

**(४) २४३० (२२-१२-२०१४). श्री. प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील मागोठाणे येथील अंगणवाडी व बालवाडींची अत्यंत दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अंगणवाडी व बालवाडीच्या दुरुस्तीकरीता तसेच आधुनिक व कल्पक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) अंगणवाडी केंद्राकरीता आधुनिक व कल्पक शैक्षणिक साहित्य खालीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

अ) तोंड ओळख इंग्रजी भाषेची - दि. २.०४.२०१४ रोजी पुरवठा करण्यात आले आहे.

ब) प्रबोधनपर माहिती पुस्तिका - दि. २८.१०.२०१४ रोजी पुरवठा करण्यात आले आहे.

क) प्रबोधन संदेश चार्ट - दि. २८.१०.२०१४ रोजी पुरवठा करण्यात आले आहे.

ड) प्रबोधनपर फ्लॅश कार्ड - दि. २८.१०.२०१४ रोजी पुरवठा करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमेश्वर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) कुटगिरी येडगेवाडी मधील कुटूंबे राजिवली येथील रेशनदुकानास जोडणेबाबत**

**(५) ३१५९ (१५-०१-२०१५). श्री. सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) कुटगिरी येडगेवाडी ग्रामस्थांना रेशनवरील धान्य मिळविण्यासाठी तब्बल २६ कि.मी. पायपीट करावी लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कुटुंबे नजीक असणा-या राजिवली येथील रेशन दुकानाला जोडणेबाबत संबंधित ग्रामस्थांनी वारंवार पुरवठा अधिकारी, तहसिलदार यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२५-०२-२०१५) :** (१) संगमेश्वर तालुक्यातील कुटगिरी येडगेवाडी ग्रामस्थांसाठी असलेले रास्तभाव दुकान १२ कि.मी.अंतरावर आहे.

(२) व (३) मौ.कुटगिरी येथील येडगेवाडी ग्रामस्थांनी याबाबत, तहसीलदार संगमेश्वर यांच्या कार्यालयात निवेदने दिली असून, त्या निवेदनांच्या अनुषंगाने संबंधीत ग्रामस्थांच्या येडगेवाडीच्या शिधापत्रिका ६ कि.मी. अंतरावरील मौजे राजिवली येथील रास्तभाव दुकानाला जोडण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मीरा-भाईंदर (जि.ठाणे) येथे स्वतंत्र न्यायालयाची निर्मिती करणेबाबत**

**(६) ३१८७ (२३-१२-२०१४). श्री. नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मीरा-भाईंदरमध्ये स्वतंत्र न्यायालय उपलब्ध नसल्याने येथील नागरिकांना न्यायालयीन कामांसाठी वारंवार ठाणे शहरात जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शहरासाठी नागरिकांच्या मागणीनुसार दोन वर्षापूर्वी न्यायालय बांधण्यास शासनाकडून मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मंजूरीनंतर अद्यापही न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम सुरु न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम केव्हापर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०१-२०१५) :** (१) व (२) होय.

मीरा -भाईंदर येथे न्यायालयाची इमारत (तळ +३) बांधण्याच्या कामाकरीता शासन निर्णय, विधि व न्याय विभाग क्र. सीसीबी- २०१२ /७८६/प्र.क्र.१५५/का-१३, दि.११/०३/२०१३ अन्वये रु. ७,६३,८६,३७२/- अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) सदर कामास दि. १२/०९/२०१३ रोजी मुख्य अभियंता यांचेकडून तांत्रिक मान्यता प्राप्त झाली. त्यानंतर मिरा-भाईंदर महानगर पालिकेकडून आवश्यक त्या मंजुरी घेऊन ऑगस्ट, २०१४ मध्ये सदर इमारतीच्या बांधकामास सुरुवात झाली. सद्यस्थितीत पिल फाऊंडेशनचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) सदरहू न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

---

**वसई तालुक्यातील वाया बंद येथे नवीन जेट्टी तसेच पाचुबंदर, किल्ला बंदर येथे जेट्टी, यार्ड, धक्के व चौथे बांधुन देण्याबाबत**

**(७) ३२२० (२२-१२-२०१४). श्री. क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेअरमन, वसई मच्छिमार सर्वोदय सहकारी संस्था, मार्या वसई यांनी दिनाक २६ फेब्रुवारी, २०१३ रोजीच्या निवेदनाद्वारे पाचुबंदर ते किल्ला बंदर येथे राष्ट्रीय कृषी विकास योजना किंवा अन्य योजनेतुन ४ जेटटयाचे बांधकाम करुन मिळण्याची मागणी आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१५) :** (१) होय.

(२), (३) व (४) पाचूबंदर ते किल्लाबंदर या लांबीमध्ये एकूण ४ जेट्टीचे बांधकाम प्रस्तावित केलेले होते. त्यापैकी पाचूबंदर येथील जेट्टीचे बांधकाम नाबार्ड टप्पा नं. १६ अंतर्गत पूर्ण करण्यात आलेले आहे. उर्वरित ३ जेटटीचे बांधकाम हे नाबार्ड टप्पा नं. १९ अंतर्गत प्रस्तावित करण्यात आले. परंतु नाबार्डकडून निधी प्राप्त न झाल्यामुळे सदर कामे ही नाबार्डच्या पुढील टप्प्यात अथवा राष्ट्रीय कृषि योजनेअंतर्गत घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### लातूर जिल्ह्यात मांजरा नदीवर उभारण्यात आलेल्या खुलगापूर, साई, धनेगाव व डोंगरगाव बराजसाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(८) ३२८० (२३-१२-२०१४). श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात मांजरा नदीवर उभारण्यात आलेल्या खुलगापूर, साई, धनेगाव व डोंगरगाव बराजसाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना अद्याप देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास शेतकऱ्यांना मोबदल्याची किती रक्कम देणे बाकी आहे,

(३) शेतकऱ्यांना मोबदल्याची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

(२)

| | | |
|---|---|---|
| १ | खुलगापूर | मावेजा वाटप पूर्ण |
| २ | साई | रु. ११३.७२ लक्ष |
| ३ | धनेगाव | रु. ३९७७.०० लक्ष |
| ४ | डोंगरगाव | रु. ५६७.९७ लक्ष |
| | एकूण | रु. ४६६९.६९ लक्ष |

(३) निधी उपलब्धतेनुसार निधी वितरीत करण्यात येत आहे.

---

### लातूर विभागीय जात प्रमाणपत्र कार्यालयात अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(९) ३२८४ (२२-१२-२०१४). श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूरच्या विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती अंतर्गत लातूर, उस्मानाबाद, नांदेड, हिंगोली या ४ जिल्हयातील जात प्रमाणपत्र देण्याचे कामकाज ठप्प असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जातप्रमाणपत्र पडताळणी समितीला प्रभारी अध्यक्षांची नेमणूक असल्याने कामकाजात दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत जातपडताळणीचा निपटारा लवकर करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१७-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशतः खरे आहे.
(३) जात प्रमाणपत्र पडताळणी समिती अध्यक्षांच्या नियुक्तीसाठी महसूल व वन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ठिंबक सिंचनाचे अनुदान केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ७५ ते ९० टक्के पर्यंत वाढवणे आवश्यक असल्याबाबत**

**(१०) ३२९१ (२२-१२-२०१४). श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ठिंबक सिंचनाचे अनुदान केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ७५ ते ९० टक्के पर्यंत वाढवणे आवश्यक असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठिंबक सिंचन व नव्याने होत असलेली शेततळे याचे अनुदान अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) सन २०१३-१४ अखेर, सुक्ष्म सिंचनाचे सन २०११-१२ मधील रु.८२.८९ कोटी व सन २०१२-१३ मधील रु.४१७.५६ कोटी निधीचे प्रस्ताव प्रलंबित होते.

ज्या शेततळ्यांची कामे पूर्ण झाली आहेत, त्यांचे अनुदान पूर्णपणे वितरीत करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत शेततळ्यांचे कोणतेही अनुदान प्रलंबित नाही.
(३) प्रश्न भाग १ बाबत केंद्र शासनाकडून कोणत्याही प्रकारचे निर्देश प्राप्त झाले नसल्यामुळे, प्रश्न उद्भवत नाही.

सन २०११-१२ मधील प्रलंबित प्रकरणांसाठी राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन योजनतून निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून संपूण प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. सन २०१२-१३ मधील प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्यासाठी सन २०१४-१५ मध्ये रु.२१२.४३ कोटी रकमेची पुरवणी मागणीद्वारे तरतूद केली असून त्यापैकी रु.१२७.४६ कोटी एवढा निधी वितरीत करयात आला आहे. रु.१२०.०० कोटी नाबार्डकडून कर्ज घेण्याची कार्यवाही चालु आहे. त्याचप्रमाणे जिल्हा स्तरावर सदर योजनेसाठी रु.८५.१३ कोटी निधी उपलब्ध आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगणघाट (जि.वर्धा) येथील नगरपालिका क्षेत्रातील वना नदीवरील बंधाऱ्याचे बांधकाम अद्याप पूर्ण करण्यात आले नसल्याबाबत**

**(११) ३२९३ (२३-१२-२०१४). श्री. समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) येथील नगरपालिका क्षेत्रातील वना नदीवरील बंधाऱ्याचे बांधकाम अद्याप पूर्ण करण्यात आले नसल्याने पिण्याच्या पाण्याच्या समस्या वाढल्या असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बंधाऱ्यांचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१९-०३-२०१५) :** (१) हिंगणघाट जिल्हा वर्धा येथील नगरपालिका क्षेत्रातील वणा नदीवरील बंधाऱ्याचे बांधकाम अद्याप पूर्ण करण्यात आले नाही हे खरे आहे. मात्र, नोव्हेंबर, २०१४ मध्ये शहरात पिण्याच्या पाण्याची समस्या वाढलेली नाही. शहराची पाणी पुरवठा योजना १२.०० एमएलडी इतकी असून दैनंदिन १०.०० एमएलडी पाणीपुरवठा वितरीत करण्यात येतो. शहराची लोकसंख्या १.०० लक्ष असून दरडोई १०० लिटर पाणीपुरवठा होत आहे.

(२) हिंगणघाट पाणीपुरवठा योजनेच्या वाढीव कामांची सखोल तपासणी करण्यासाठी चौकशी समिती गठीत करण्यात आली. या चौकशी समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने अधिक तपासणी करु घेऊन शासनास अहवाल सादर करण्याच्या सूचना मुख्याधिकारी, नगरपरिषद हिंगणघाट यांना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हातकणंकले (जि.कोल्हापूर) येथे सांगली-कोल्हापूर या रस्त्यांवर आय.आर.सी. मानकांप्रमाणे सेवा रस्ते (सर्विस रोड) व जंक्शन सुधारणेबाबत**

**(१२) ३२९४ (२४-१२-२०१४). डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातकणंकले (जि.कोल्हापूर) येथे सांगली-कोल्हापूर या रस्त्यांवर आय.आर.सी. मानकांप्रमाणे सेवा रस्ते (सर्विस रोड) व जंक्शन सुधारणेबाबचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे, या कामास केव्हापासून सुरुवात करण्यात येणार आहे,

(३) अद्यान निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०३-२०१५) :** (१) खाजगीकरणांतर्गत मंजूर असलेल्या व सद्यःस्थितीत काम प्रगतीत असलेल्या शिरोली (कोल्हापूर) ते सांगली या रस्ताची सुधारणा करणे या प्रकल्पांतर्गत सेवा रस्ते व जंक्शन सुधारणा करणे ह्या बाबी समाविष्ट आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हापरिषदेतील सामान्य प्रशासन विभागात अर्थपूर्ण व्यवहार होऊन कर्मचा-यांना पदोन्नती, बदली, वा बढत्या देण्यात येत असल्याबाबत**

**(१३) ३३०२ (२२-१२-२०१४). डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हापरिषदेतील सामान्य प्रशासन विभागात अर्थपूर्ण व्यवहार होऊन आपल्या मर्जीतील कर्मचा-यांना पदोन्नती, बदली, वा बढत्या देण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) चौकशीनुसार संबंधित किती अधिका-यांवर कोणत्या कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) ते (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आगारदांडा (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथील दिघी पोर्टतर्फे विकसित होणाऱ्या कामांना मंजूरी नसल्याबाबत**

**(१४) ३३१९ (१५-०१-२०१५). श्री. भरतशेठ गोगावले (महाड), श्री. मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आगारदांडा (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथील दिघी पोर्टतर्फे विकसित होणाऱ्या कामांना मंजूरी नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बेकायदेशीर बांधकामाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील गिरणी कामगारांना स्वस्त दरात घरे मिळण्याबाबत**

**(१५) ३३२९ (२३-१२-२०१४). श्री. सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गिरणी कामगारांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्य शासनाने गिरण्यांच्या जागेवर घरे बांधण्यासाठी आलेल्या बांधकामाच्या खर्चात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असल्याने प्रत्यक्ष विक्री किमतीत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू किमती गिरणी कामगारांच्या आवाक्याबाहेरील असल्याने गिरणी कामगारांना स्वस्त दरात घरे उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाकडून आजतागायत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०३-०३-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

मुंबईतील गिरणी कामगारांच्या विविध प्रश्नांबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी नगरविकास विभागाच्या शासन निर्णय दि. १२.१२.२००६ अन्वये मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये गिरणी कामगारांच्या प्रतिनिधींचाही समावेश आहे.

मुंबईतील बंद/आजारी कापड गिरण्यांच्या जमिनीपैकी बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ५८(१) (बी) नुसार संबंधित गिरणी कामगारांचया घरांकरीता उपलब्ध झालेल्या साधारणतः २.८४ हेक्टर जमीन आणि उर्वरीत गिरण्यांकडून यापुढे उपलब्ध होणा-या जमिनीवर बांधकाम खर्च विचारात घेऊन शासन स्तरावर होणा-या चर्चेप्रमाणे जी किंमत निश्चित होईल, ती किंमत गिरणी कामगारांतर्फे अदा करण्याची तत्वतः सहमती गिरणी कामगार संघटनांच्या प्रतिनिधींकडून दि. ७ नोव्हेंबर, २०१३ रोजी प्रधान सचिव (गृहनिर्माण) यांच्याकडे नगरविकास, कामगार विभाग व वस्त्रोद्योग विभागाच्या अधिका-यांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चेत दर्शविली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील कुर्डुवाडी-टेंभूणी, बाशी, तुळजापूर या रस्त्याची मोठ्या प्रमाणात झालेली दुरावस्था**

**(१६) ३३३९ (२३-१२-२०१४). श्री. बबनराव शिंदे (माढा), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील कुर्डुवार्डी-टेंभुर्णी, बार्शी, तुळजापूर या रस्त्याची मोठया प्रमाणात दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याची दुरावस्था सुधारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०३-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) प्रश्नाधीन टेंभूर्णी-कुर्डुवाडी-बार्शी राज्यमार्ग क्र. १४५ ची एकूण लांबी६७.७० कि.मी. आहे. या लांबीपैकी पावसाळ्यात क्षतिग्रस्त झालेल्या २.४० कि.मी. लांबीतील रस्त्याच्या मजबुतीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच २.०० किमी. लांबीतील मजबुतीकरणाचे काम प्रगतीत असून ११.३० कि.मी. लांबीतील काम निविदा स्तरावर आहे. उर्वरित लांबीतील रस्ता सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.

तसेच प्रश्नाधीन बार्शी-तुळजापूर राज्यमार्ग क्र.२०६ ची एकूण लांबी ३६.८०० कि.मी. आहे. या लांबीपैकी १०.८०० किमी लांबीतील मजबुतीकरणाचे काम मंजूर असून निविदा स्तरावर आहे. उर्वरीत लांबीतील रस्ता सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथील सेशन कोर्टाच्या नवीन इमारतीचे अद्याप उद्घाटन न झाल्याबाबत**

**(१७) ३३४१ (१५-०१-२०१५). श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथे सेशन कोर्टाची नवीन इमारत बांधून पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) या इमारतीचे उद्घाटन करण्यात आले आहे काय,

(३) अद्याप उद्घाटन केले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व या इमारतीचे उद्घाटन करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१५) :** (१) नाही. तथापि पंढरपूर जि.सोलापूर येथील न्यायालयीन इमारतीचे बांधकाम अंतीम टप्प्यात असून मार्च, २०१५ अखेर काम पूर्ण होणार आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील चांदवड, मनमाड, नांदगांव राज्यमार्ग**
**बी.ओ.टी. तत्वावरील रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(१८) ३३६४ (२४-१२-२०१४). श्री. छगन भुजबळ (येवला), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम उपविभाग, चांदवड या उपविभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या चांदवड, मनमाड, नांदगांव राज्यमार्ग बी.ओ.टी. तत्वावर असून या रस्त्याचे मोठमोठे खड्डे पडल्याने वाहने चालविताना अडचणींचा त्रास सहन करावे लागत असून तेथे अपघाताचे प्रमाणही वाढलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याच्या दुर्दशेबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तदनुसार सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०२-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) उद्योजकाने रस्त्याची दुरुस्ती न केल्याने पथकर शुल्क वसुली बंद करण्यात आली आहे. सध्या विभागामार्फत दुरुस्तीचे काम सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने नवनगर विकास प्राधिकरणातील क्षेत्रावर**
**पर्यावरण विभागाची पूर्वपरवानगी न घेताच बांधकाम केल्याबाबत**

**(१९) ३३८१ (१५-०१-२०१५). श्री. लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक १४ ऑक्टोबर, २०१४ रोजी पर्यावरण विभागाच्या सचिवांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणातील पेठ क्र. १७ व १९ च्या क्षेत्रावर पर्यावरण विभागाची पूर्वपरवानगी न घेताच केलेल्या बांधकामाबाबत सर्व संबंधितांवर

पर्यावरण रक्षण कायद्याप्रमाणे कारवाई करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशाप्रमाण पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांनी व पिंपरी-चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) मनपा आयुक्त व पिंपरी-चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत कोणतीही कारवाई केली नसल्यास, पर्यावरण विभागाच्या सचिवांमार्फत उचित कारवाई करण्यात येईल असे सदर आदेशात नमूद होते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी पर्यावरण विभागाचे सचिव यांच्या मार्फत करण्यात आलेल्या कारवाईचा तपशिल काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२३-०२-२०१५) :** (१) दि. १४ ऑक्टोबर, २०११ रोजीच्या आदेशान्वये तत्कालीन सचिवांनी पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अन्वये अंतिम निर्देश आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांना सहा प्रकल्पाच्या अनुषंगाने दिले होते.
(२) पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी या प्रकरणी केलेल्या पत्रव्यवहारानंतर पिंपरी-चिंचवड महारगरपालिकेने स्थानिक प्राधिकरण म्हणून सदर प्रकल्पाशी त्या-त्या कालावधीतील संबंधित जबाबदार अधिका-यांवर त्यांच्या सेवा नियमानुसार अनुज्ञेय निवृत्ती वेतनामधून कपात, वेतनवाढ स्थगिती तसेच प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.
(३) होय.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील निराधार व विधवा महिला संजय गांधी निराधार योजनेपासून वंचित असल्याबाबत

**(२०) ३४३५ (२२-१२-२०१४). श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) या तालुक्यातील निराधार व विधवा महिलांना संजय गांधी निराधार योजनेपासून वंचित असल्यामुळे त्यांच्यात असंतोष पसरला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू तालुक्यातील निराधार व विधवा महिलांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) भिवंडी, जि.ठाणे येथील संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांना माहे नोव्हेंबर, २०१४ पर्यंतचे अनुदान वाटप करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पैठण (जि.औरंगाबाद) येथील शासकीय आरोग्य प्रशिक्षण केंद्र पैठणचे १०० खाटांच्या रुग्णालयात रुपांतर करणेबाबत**

**(२१) ३४८५ (२३-१२-२०१४). श्री. संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) येथील शासकीय आरोग्य प्रशिक्षण केंद्र पैठण १०० खाटांच्या रुगणालयात रुपांतर करण्यास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतरही अद्यापपावेतो त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात कोणतीच कार्यवाही झाली नसल्यास, त्यांची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२१-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पैठण (जि.औरंगाबाद) येथील आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या संत ज्ञानेश्वर उद्यानाची झालेली दुर्दशा**

**(२२) ३४८९ (२३-१२-२०१४). श्री. संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील पैठण येथील आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या संत ज्ञानेश्वर उद्यानाची देखभाल एका खाजगी संस्थेमार्फत चालविण्यात येत होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेची मुदत संपल्याने उक्त उद्यानाची देखभाल करण्याचे काम जायकवाडी पाटबंधारे विभागाकडे देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उद्यानाची देखभाल पाटबंधारे विभागाकडे आल्यापासून उद्यानाची अत्यंत दुर्दशा झाल्याने या कामाची तातडीने विशेष निधी देऊन उद्यानाची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी परिसरातील नागरीकांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या उद्यानासाठी विशेष निधी देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

सदर संस्थेने करारातील अटी व शर्तीनुसार महसूल विभागाचा करमणूक कर न भरल्या कारणाने महसूल खात्याने दिनांक ०२.०३.२०१२ रोजी सदर उद्यान व उद्यानातील मालमत्तेची हानी होवू नये म्हणून महसूल खात्याने सदर उद्यान दिनांक ०५.०३.२०१२ पासून जलसंपदा खात्याच्या ताब्यात दिले.

(३) हे खरे नाही, तथापि स्थानिक लोकांनी उद्यान दुरुस्तीची मागणी केली आहे.

(४) ''पैठण तिर्थक्षेत्र विकास प्राधिकरण'' अंतर्गत जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे निधी उपलब्धतेची प्रस्ताव मुख्य अभियंतामार्फत पाठविण्यात येत आहे.

---

**दौंड (जि.पुणे) तालुक्यासाठी महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत मंजुर झालेल्या कामांबाबत**

**(२३) ३५०० (२३-१२-२०१४). श्री. राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड तालुक्यासाठी (जि. पुणे) जलसंपदा विभागाने खडकवासला पाटबंधारे पुणे यांच्या अंतर्गत महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत वितरण प्रणालीचे पुनर्स्थापनेची विविध कामे मंजुर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंजुर कामांसाठी किती निधी मंजुर करण्यात आला व उक्त प्रकल्पांतर्गत दौंड तालुक्यात किती व कोणकोणती कामे मंजुर झाली आहेत व या मंजुर कामांपैकी किती कामे पुर्ण झाली आहेत तसेच मंजूर कामांपैकी अद्यापही पूर्ण न झालेली कामे कोणती आहेत,

(३) सदर प्रकल्पांतर्गत मंजुर झालेल्या कामांवर आतापर्यत किती निधी खर्च झाला आहे तसेच या प्रकल्पांतर्गत मंजुर झालेल्या दौंड तालुक्यातील वितरण प्रणालीचे सुधारणा करणेबाबत अद्यापही पुर्ण न झालेली कामे किती कालावधीत पुर्ण केली जाणार आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत दौंड तालुक्यातील एकूण २० पाणी वापर संस्थांच्या वितरण प्रणालीच्या पुनर्स्थापनेची कामे मंजूर असून या कामांसाठी एकूण रु. ८२७.८७ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला होता. त्यापैकी रु. ७६६.१५ लक्ष इतका निधी खर्च झाला आहे व सर्व कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

---

**जिरेगांव (ता. दौंड, जि.पुणे) येथील लघुपाटबंधारे तलावास जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेमधुन पाणी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(२४) ३५०१ (२३-१२-२०१४). श्री. राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या हिंगणीगाडा शाखा कालव्यामधुन जिरेगांव (ता.दौंड, जि.पुणे) येथील लघुपाटबंधारे तलाव पाण्याने भरुन देणेसाठी करावयाच्या कामासाठी रु.५० लक्ष खर्चाच्या कामास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे यांनी जा.क्र. मुअ/का.अ-३/४२२२ दि. ०३ जुलै, २००६ अन्वये कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्ताव तातडीने मान्यता देवून जिरेगांव लघुपाटबंधारे तलाव जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेस केव्हापर्यंत पाणी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१५) :** (१) नाही.

सदर प्रस्ताव हिंगणीगाडा शाखा कालव्याअंतर्गत वासुंदे भरण कालव्यातून वाघदरा तलावासाठी भरण कलवा तयार करणेच्या कामासाठी आहे. या प्रस्तावात जिरेगांव ल.पा. तलाव पाण्याने भरुन देणेसाठी करावयाच्या कामाचा समावेश नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रामध्ये डोंबेवाडी (खोरे) (ता. दौंड, जि. पुणे) येथील पाझर तलावाचा समावेश करणेबाबत**

**(२५) ३५०२ (२३-१२-२०१४). श्री. राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील पुरंदर उपसा सिंचना योजनेच्या लाभक्षेत्रामध्ये डोंबेवाडी (खोरे) (ता.दौंड, जि.पुणे) येथील पाझर तलावाचा समावेश करणेसाठी या योजनेच्या माळशिरस वितरिकेची ९.५ कि.मी. लांबी वाढविणे व त्यासाठी आवश्यक वितरण व्यवस्था निर्माण करणे यासाठी रुपये ३११ लक्ष इतक्या निधीची आवश्यकता असून या प्रस्तावाबाबत वरिष्ठ स्तरावरुन धोरणात्मक निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांनी पत्र क्र.जा.क्र.पुपाप्रमं /पशा - ५ /पुरंदर/खोर - मागणी / ५३५ / दि. १८ जानेवारी, २००७ अन्वये मुख्य अभियंता जलसंपदा विभाग पुणे यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावास मान्यता मिळाली आहे काय, तसेच या प्रस्तावास अद्यापही मान्यता मिळाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

(३) सदर प्रलंबित प्रस्तावाची सद्यःस्थिती काय आहे, तसेच किती कालावधीत या प्रस्तावास मान्यता मिळणे अपेक्षित आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१५) :** (१) होय.

म.कृ.खो.वि. महामंडळाकडून पुरंदर उपसा सिंचन योजना प्रकल्प (भाग-२) योजनेच्या मुख्य वितरिका व उपवितरिकांपासून बंद पाईपलाईनद्वारे पाझर तलाव जोडणेबाबतचा प्राथमिक अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे. यामध्ये डोंबेवाडी (खोर) तलावाचा समावेश आहे.

(२) पाणी उपलब्ध नसल्याने प्राथमिक अन्वेषण अहवाल शासनाने अमान्य केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौंड व बारामती तालुक्यातील (जि.पुणे) पाझर तलाव जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजनेतून भरणेबाबत**

**(२६) ३५०३ (२३-१२-२०१४). श्री. राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजनेतून दौंड व बारामती तालुक्यातील ६५ पाझर तलाव भरण्यास शासनाचे पत्र क्र.जनाई/१०९३/१०५९/(१/९३) जसंअ मंत्रालय, मुंबई दिनांक २८ फेब्रुवारी, १९९६ अन्वये तत्वत: मंजूरी देण्यात आली आहे तसेच ही ६५ पाझर तलावे भरण्याच्या कामाचा समावेश असलेल्या टिप्पणीस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे यांनी मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मंजूर केलेल्या एकूण ६५ पाझर तलावांमध्ये रोटी व जिरेगांव तसेच गट क्र.४ मधील कौठडी, भोळोबाचीवाडी (जिरेगांव क्र.२) या पाझर तलावांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पाझर तलाव भरणेसाठी आवश्यक असणा-या वितरिकांची कामे करण्यात आली आहेत काय, तसेच या आवश्यक असणा-या वितरकांच्या कामांची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१५) :** (१) होय.

(२) अंशतः खरे आहे.

शासनाने मंजूर केलेल्या एकूण ६५ पाझर तलावांच्या यादीमध्ये रोटी व जिरेगांव या तलावांचा समावेश नाही. तथापी मौजे कौठडी व भोळोबावाडी (जिरेगाव क्र.२) या तलावांचा शासनाने मंजूर केलेल्या ६५ तलावांच्या यादीत समावेश आहे.

(३) भोळोबाची वाडी (जिरेवाडी क्र.२) हा पाझर तलाव भरण्यासाठी आवश्यक वितरिकांची कामे पूर्ण आहे. भोळोबावाडी पाझर तलावाच्या नाल्याच्या खालील बाजूस कोठडी पाझर तलाव असल्याने स्वतंत्र वितरिकेची गरज नाही.

---

**म्हाडाद्वारे बांधण्यात आलेल्या शौचालयाच्या व्यवस्थेची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याबाबत**

**(२७) ३५१५ (२३-१२-२०१४). श्री. मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाद्वारे बांधण्यात आलेल्या शौचालयाच्या व्यवस्थेची जबाबदारी स्थानिक संस्थांकडे योग्यप्रकारे न सोपविल्यामुळे अनेक ठिकाणी शौचालयाची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शौचालये ही आरसीसीचा वापर न करता बांधली गेली असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,

(४) तद् नुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (११-०३-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

(२), (३), (४) व (५) सदर शौचालये आर.सी.सी. चा वापर न करता बांधली आहेत, हे खरे आहे. आर.सी.सी. ऐवजी Load Bearing बांधकाम करुन त्यावर पत्राशेड टाकण्यात येते. तसेच शौचालयाची बहुधा जागा शासनाची नसते, त्यामुळे जागेचा चटई निर्देशांक क्षेत्राचा प्रश्न उद्भवत असल्यामुळे आर.सी.सी. सारखे पक्के बांधकाम बांधणे शक्य होत नाही. तथापि, स्थानिक रहिवाशी संस्थांकडून ज्या स्वच्छतागृहांची दैनंदिन देखभाल होत नाही, अशा स्वच्छतागृहांची दैनंदिन देखभाल करण्यासाठी कार्यवाही विचाराधीन आहे.

---

**राज्यातील शाळांमध्ये "थोराची ओळख" पाठयपुस्तक समाविष्ट करण्याबाबत**

**(२८) ३५२४ (२२-१२-२०१४). श्री. चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ज्या थोर पुरुषांनी देश स्वतंत्र करण्यासाठी बलिदान दिले अशा थोर पुरुषांचे सदैव स्मरण होत राहावे या करीता "थोराची ओळख" पाठ्यपुस्तक सुरु केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाठ्यपुस्तकाची प्रभावी अंमलबजावणी सुरु करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-०२-२०१५) :** (१) नाही. प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ नुसार इयत्ता तिसरीसाठी परिसर अभ्यास हे पाठ्यपुस्तक निर्धारित केलेले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यात डोंगरगाव येथील टेकडी वरील खनिज उत्खननबाबत

**(२९) ३५३६ (२२-१२-२०१४). श्री. चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातील डोंगरगाव येथील टेकडी वरील खनिज उत्खनन मोठ्या प्रमाणात सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खनिज उत्खननासाठी कोणत्या निकषाच्या आधारे परवानगी केव्हा व किती वर्षासाठी दिली,

(३) असल्यास, उत्खनन करताना ब्लास्टींगच्या वेळी स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घेतात, हे खरे आहे काय,

(४) तसेच या टेकडीवर प्राचीनकालीन शिव मंदीर व टेकडीखाली प्राचीनकालीन कधीही न आटणारे दुधाळ पाणी असणारी पाण्याची विहिर आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उत्खननामुळे या प्राचीनकालीन वारसाचे अस्तित्व धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. प्रकाश मेहता (१९-०१-२०१५) :** (१) व (२) मौजे डोंगरगांव ता.मोहाडी जिल्हा भंडारा येथील सर्वे नं ४९७ मधील ४.६८ हेक्टर क्षेत्रावर क्वाटर्झ व क्वार्टझाईट खनिजासाठी खाण व खनिजे (विकासन व विनियमन) अधिनियम १९५७ च्या नियम १० (३) नुसार दिनांक ०४.०९.२००० च्या शासन आदेशान्वये ३० वर्षाकरीता श्री.मनोहर सिंगनजुडे यांना खाणपट्टा मंजूर केलेला असून खाणपट्ट्याचा कालावधी दिनांक २९.०१.२०३१ पर्यंत आहे.

(३) होय.

(४) होय.

(५) नाही.

(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सांगली जिल्ह्यात पाणी योजनेतील उंच पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम केल्याबाबत

**(३०) ३५५४ (२३-०२-२०१५). श्री. रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात पाणी योजनेतील उंच पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम करु शकणाऱ्या जत तालुक्यातील ११ गावाच्या पाणी समित्यांवर सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी फौजदारी आणि महसूल वसूली करण्याचे आदेश माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशाची अंमलबजावणी कशाप्रकारे करण्यात आली आहे,
(३) असल्यास, किती गावांच्या पाणी समित्यांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-०३-२०१५) :** (१) हे अशंतः खरे आहे. जत तालुक्यातील ११ गावांच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना संबंधित गांवातील अपुर्ण पाणी पुरवठा योजनांमधील टाकीची कामे हाती घेण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देऊनही ती कामे हाती घेतली नाहीत. त्यामुळे कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १९/०५/२०१४ रोजीच्या जिल्हा आढावा बैठकीमध्ये संबंधित ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांवर आर आर सी करणे व पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे नोंद करणेचे निर्णय घेतलेले आहेत.
(२) व (३) सांगली जिल्ह्यामध्ये एकूण ६३ नळ पाणी पुरवठा योजनांची कामे रखडलेली असून ती पुर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे, जत तालुक्यातील ९ गावांमधील नळ पाणी पुरवठा योजनांतील उंच टाक्यांची कामे हाती घेण्यात न आल्यामुळे संबंधित ग्राम पाण पुरवठा व स्वच्छता समित्यांवर आर आर सी करणे व पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे नोंद करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, यापूर्वी कोसारी, जानराववाडी, भोसे, बनाळी, रेवनाळ, ढवळेश्वर, मुंचडी व माडग्याळ या ८ गावांमधील ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांविरुध्द पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

---

**विवा महाविद्यालय वसई (जि.पालघर) येथे एम.एच.टी-सी.टी.चे उपकेंद्र सुरु करण्याबाबतची मागणी**

**(३१) ३६०९ (२२-१२-२०१४). श्री. हितेंद्र ठाकूर (वसई), श्री. क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री. विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विवा महाविद्यालय वसई (जि.पालघर) येथे एम.एच.टी-सी.टी.चे उपकेंद्र सुरु करण्यात यावे अशी मागणी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या महापौरांनी दिनांक १२ मार्च, २०१२ रोजी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वैद्यकिय शिक्षणमंत्री यांचेकडे एका निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) सदरहू एम.एच.टी.सी.टी. विवा महाविद्यालय येथे उभारण्याच्या दृष्टीने शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२१-०२-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) एमएचटी-सीईटी या सामाईक प्रवेश परीक्षेच्या आयोजनाकरीता प्रत्येक जिल्हाचे जिल्हाधिकारी यांना केद्र प्रमुख म्हणून नियुक्त करण्यात येत असून सदर परीक्षेचे गोपनीय

साहित्य प्रत्यक जिल्ह्याच्या जिल्हा कोषागारामध्ये ठेवण्यात येते. त्यामुळे सदर परीक्षेच्या आयोजनाकरीता गोपनियता, प्रशासकीय आणि तांत्रिक बाबीमध्ये सुसूत्रता यावी या कारणांसाठी परीक्षा फक्त जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी घेण्यात येते.

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात घेण्यात येणा-या एमएच-सीईटी-२०१५ करीता नवनिर्मित पालघर जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी परीक्षेचे केंद्र निश्चित करण्यात येईल.

---

**होट्टल (ता.देगलूर, जि नांदेड.) या पर्यटन स्थळाचा केंद्र शासनाच्या मेगा टूरिझम सर्कीट डेव्हलपमेंट या योजनेमध्ये समावेश करण्यात आल्याबाबत**

**(३२) ३६२७ (२३-१२-२०१४). श्री. सुभाष साबने (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) होट्टल (ता.देगलूर, जि नांदेड.) या पर्यटन स्थळाचा विकास करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या मेगा टूरिझम सर्किट डेव्हलपमेंट या योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत किती रुपयाचा निधी उपलब्ध झाला आहे,

(३) उक्त योजनेंतर्गत आतापर्यंत कोणत्या कामावर किती खर्च करण्यात आला आहे वा येणार आहे,

(४) आतापर्यंत खर्च झाला नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०१-२०१५) :** (१) होय.

(२) सदर योजनेंतर्गत मंजूर निधी रु. ३४४.९४ लक्ष असुन वितरीत निधी रु. १७२.४७ लक्ष आहे.

(३) वास्तुशास्त्रज्ञावर खर्च झालेला आहे.

(४) या कामासाठी जिल्हाधिकारी, नांदेड हे कार्यान्वयीत यंत्रणा आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने या कामासाठीचा उपलब्ध निधी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे वर्ग केलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांचे मार्फत या कामासाठी रु. २८२.४४ लक्षची निविदा काढण्यात आली आहे. मे. यश कन्स्ट्रक्शन कंपनी, बीड यांची रु. २९३.७४ लक्ष किंमतीची निविदा त्यांचेमार्फत स्विकृत केलेली आहे. तथापि जमिनीच्या वादामुळे व त्या अनुषंगाने उद्भवलेल्या न्यायालयीन प्रकरणामुळे काम अद्याप सुरु व्हावयाचे आहे. यामुळे खर्च झालेला नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील येसगी (ता.बिलोली) येथील महाराष्ट्राच्या हद्दीमध्ये आंध्र शासनाने (तेलंगणा) घूसखोरी करुन सालूरा उपसा जलसिंचन योजना राबविली असल्याबाबत**

**(३३) ३६२८ (२३-१२-२०१४). श्री. सुभाष साबने (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील येसगी ता.बिलोली येथील महाराष्ट्राच्या हद्दीमध्ये घूसखोरी करुन आंध्र शासनाने (तेलंगणा) मांजरा नदीच्या पात्रामध्ये मोठे-मोठे जॅकेवल (भूमिगत विहरी) खोदून त्या द्वारे सालूरा (जि.निझामाबाद) उपसा जलसिंचन योजना कार्यन्वित केल्यामुळे महाराष्ट्र शासनाने केंद्रीय जल आयोगाकडे आक्षेप घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) शासनाने घेतलेल्या आक्षेपावर केंद्रीय जल आयोगाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा निर्णय दिला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) तत्कालीन केंद्रीय जलसंसाधन मंत्री यांनी दि. २१/४/२००८ च्या पत्रान्वये सदर बाब दोन राज्यांच्या हद्दीशी संबंधित असल्याने ही बाब जलसंसाधन मंत्रालयाच्या कक्षेत येत नाही, असे मत दिले आहे.

---

**गोदावरी खोऱ्यातील पाण्याचे समन्यायी पध्दतीने करण्याबाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा निर्णय**

**(३४) ३६३० (२३-१२-२०१४). श्री. सुभाष साबने (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी खोऱ्यातील पाण्याचे समन्यायी पध्दतीने वाटप करण्याबाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने जायकवाडीच्या वरच्या धरणातील १९ टी.एम.सी. पाणी जायकवाडी धरणामध्ये सोडून ते पाणी मराठवाड्यासाठी गोदावरीच्या नदीपात्रामध्ये सोडण्याचा निर्णय जलसंपदा विभागाकडे दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा विभागाकडून १९ टि.एम.सी पाणी सोडण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०१-२०१५) :** (१) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने जायकवाडीच्या वरच्या धरणातील १९ टी.एम.सी.पाणी जायकवाडी धरणामध्ये सोडण्याचा निर्णय दिलेला नाही.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे दिनांक १९.९.२०१४ च्या निर्णयानुसार जायकवाडीचे उर्ध्व भागातील धरणात वर्षात उपलब्ध होणारे पाणी व जायकवाडी धरणात

उपलब्ध झालेले पाणी याचा ऑक्टोबर मध्ये आढावा घेवून उपलब्ध पाण्याचे टक्केवारीनुसार पाणी पुनर्वितरणाच्या तक्त्यानुसार कार्यवाही करण्याचा निर्णय दिलेला आहे.
(२) दिनांक १९.९.२०१४ च्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या निर्णयानुसार गोदावरील मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक ५.१२.२०१४ च्या आदेशान्वये मुळा व प्रवरा धरण समुहातून ७.८९ टि.एम.सी. पाणी सोडण्याचे आदेश दिले. त्यानुसार मुळा धरणातून ३.६१ टि.एम.सी. व प्रवरा धरण समुहातून ३.२० टि.एम.सी. असे एकूण ६.८१ टि.एम.सी. पाणी नदीपात्रात सोडले असून त्यापैकी जायकवाडी धरणात ४.९० टि.एम.पी.पाणी पोहचले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अचलपुर (जि.अमरावती) येथे संशोधन प्रकल्पासाठी पायाभुत सुविधा निर्माण करण्याबाबत**

**(३५) ३६४४ (२२-१२-२०१४). श्री. बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अचलपुर (जि.अमरावती) येथे संशोधन प्रकल्पासाठी पायाभुत सुविधा निर्माण करण्यासाठी ४६.३० लाख रुपयांच्या निधीचा प्रस्ताव कृषि संशोधन उपकेंद्र, अचलपुर यांनी शासनाकडे दिनांक ३० जुलै, २०१४ रोजी वा त्यासुमारास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास शासनाने तातडीने मान्यता द्यावी, अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी सचिव, कृषी विभाग यांचेकडे दिनांक १९ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :** (१) नाही.
(२) होय.
(३) डॉ.पंजाबराब देशमुख कृषी विद्यापीठाने कृषि संशोधन उपकेंद्र, अचलपुर येथे वेळी पकिावरील संशोधनासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा प्रस्ताव दिनांक १६/१२/२०१४ रोजी कृषित परिषदेस सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्ताव शिफारशीसह शासनास सादर करण्याबाबत महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषरद,पुणे यांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वनरक्षक-वनपाल या कर्मचा-यांनी त्यांच्या मागण्यांसाठी केलेला संप**

**(३६) ३६४९ (२२-१२-२०१४). श्री. बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वनरक्षक-वनपाल या कर्मचा-यांनी त्यांच्या मागण्यांसाठी दिनांक २५ ऑगस्ट, २०१४ पासुन संप पुकारला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणी सदर लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री, वनविभाग यांचेकडे दिनांक ३१ ऑगस्ट, २०१४ रोजी केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या मागण्यांना पुर्तते संदर्भात काय कार्यवाही केली आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०१-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदरहू बाब वित्त विभागाशी विचार विनिमयामध्ये आहे. त्याबाबत शासन स्तरावर अंतिम निर्णय घेण्यात येईल.

---

**राज्यातील अपंगांच्या मागण्यांसंदर्भात करण्यात आलेल्या आंदोलनाबाबत**

**(३७) ३६५० (२२-१२-२०१४). श्री. बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंगांच्या विविध मागण्यासाठी करण्यात आलेल्या आंदोलन प्रसंगी ज्या मागण्या मान्य करण्याचे आश्वासन शासनाने दिले त्या आश्वासनांची पुर्तता करण्यात यावी अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जुलै, २०१४ रोजी, मा.मंत्री सामाजिक न्याय यांचेकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ९ जानेवारी, २०१३ तसेच २ व ४ फेब्रुवारी, २०१३ रोजी झालेल्या आंदोलनाच्या वेळी देण्यात आलेल्या आश्वासनांची पुर्तता होण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने उक्त संदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०२-२०१५) :** (१) होय.

सदर लोकप्रतिनिधींचे दि.७.७.२०१४ चे तत्कालीन उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे नावे असलेले निवेदन सामाजिक न्याय विभागास प्राप्त झाले आहे.

(२), (३) व (४) संबंधित लोकप्रतिनिधी यांनी दि.९ जानेवारी, २०१३ तसेच दि. २ व ३ फेब्रुवारी, २०१३ रोजी केलेल्या आंदोलनाच्या वेळी देण्यात आलेल्या आश्वासनांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे :-

१) शासकीय व अनुदानित वसतिगृहांमध्ये अपंगांच्या ३% जागा पूर्णपणे भरणे व अपंगांना सर्व सोयी सुविधा पुरविणेबाबत दि.१९/१०/२०१३ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२) आंतरजातीय विवाहाच्या धर्तीवर अपंग-अव्यंग विवाहित अपंगांना विशेष सहाय्य देण्याबाबतचा शासन निर्णय दि. १७ जून, २०१४ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

३) अपंग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याबाबतचे आदेश दि. ३० ऑगस्ट, २०१४ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत.

४) संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीवर अपंगांना प्राधान्य देण्याबाबतचा शासन निर्णय दि. २१ जानेवारी, २०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

५) अपंगांच्या शाळांच्या अनुज्ञाप्ती नुतनीकरणाबाबत दिनांक २४ जानेवारी, २०१४ रोजी हस्तांतर स्थलांतरणाच्या शासन निर्णयान्वये नुतनीकरणाचा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे.

६) इतर काही मागण्या विविध मंत्रालयीन विभागांशी संबंधित असून, संबंधित विभागांकडून गृहनिर्माण प्रकल्पात असलेले २% आरक्षण ३% करणे, जन्म-मृत्यू नोंदवहीत अपंगांची स्वतंत्र नोंद करणे, इंदिरा आवास योजनेमध्ये अपंगांना प्राधान्य देणे इत्यादींबाबत शासन अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके निर्गमित करण्यात आलेली आहेत.

७) शासन सेवेतील इतर अपंग कर्मचाऱ्यांप्रमाणे मुक-बधीर कर्मचाऱ्यांनादेखील विशेष वाहन भत्ता लागू करणेबाबत वित्त विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

८) अपंग कल्याण आयुक्तालयाचे बळकटीकरण करणे, संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या उत्पन्न मर्यादेत वाढ करणे इत्यादींबाबत या विभागातील अन्य कार्यासनांकडून स्वतंत्रपणे कार्यवाही सुरु आहे.

९) त्याचप्रमाणे जन्म-मृत्यू नोंदवहीत अपंगांची स्वतंत्रपणे नोंद ठेवण्याबाबत निर्गमित केलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी संबंधित संस्थांकडून होत नसल्याबाबत नगर विकास विभाग व ग्रामविकास विभाग या विभागांना या विभागाच्या दिनांक १/१२/२०१४ च्या पत्रान्वये कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

---

**राज्यात सुमारे २७००० संगणक परिचालक हे कंत्राटी पध्दतीवर ग्रामपंचायतीमध्ये काम करीत असल्याबाबत**

**(३८) ३६५१ (२२-१२-२०१४). श्री. बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे २७००० संगणक परिचालक हे कंत्राटी पध्दतीवर ग्रामपंचायतीमंध्ये काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संगणक परिचालकांच्या संघटनेने केलेल्या मागण्या शासनाने तातडीने मान्य करव्यात अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री ग्रामविकास यांच्याकडे दिनांक ९ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या संदर्भात काय कार्यवाही केली आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०२-२०१५) :** (१) ई-पंचायत या मिशन मोड प्रकल्पांतर्गत महाऑनलाईन या (महाराष्ट्र शासन व टाटा कन्सल्टंन्सी सर्व्हिसेस यांची सहभागीदारी कंपनी) अंमलबजावणी यंत्रणेमार्फत तांत्रिक मनुष्यबळ, तंत्रज्ञान सहाय्य व अंमलबजावणीच्या अनुषंगाने इतर सर्व सेवांसाठी १ हजार लोकसंख्येपेक्षा अधिक ग्रामपंचायतीसाठी १ व १ हजार पेक्षा कमी लोकसंख्येच्या ग्रामपंचायतीसाठी ३ ग्रामपंचायतींसाठी १ याप्रमाणे जवळजवळ २३,००० संगणक परिचालकांच्या सेवा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

(२) होय.

(३) महाऑनलाईनकडून पुरविण्यात आलेले तांत्रिक मनुष्यबळ हे राज्यशासन, जिल्हा परिषद, पंचायत समिती अथवा ग्रामपंचायतीचे कायम अथवा कंत्राटी कर्मचारी नसल्याने या तांत्रिक मनुष्यबळाच्या वैध मागण्यांवर आवश्यक ती कार्यवही करणेबाबत महाऑनलाईनला वेळोवेळी निर्देश देण्यात येत आहेत.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात अवैधरित्या सुरु असलेली वृक्षतोड

**(३९) ३६७२ (२२-१२-२०१४). श्री. वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजरोसपणे वृक्षतोड सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृक्षतोडीला बंदी असतांना सिंधुदुर्ग जिल्हा उपवनरक्षक व कुडाळ वनपरिक्षेत्रपाल यांच्या आशिर्वादाने होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०२-२०१५) :** (१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात शासकीय वनक्षेत्रात गेल्या तीन वर्षात सुमारे ६,२९३ वृक्षांची अवैधरित्या तोड झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच मालकी क्षेत्रात गेल्या तीन वर्षात सुमारे ६७,६७६ वृक्षांची अवैध तोड झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२), (३) व (४) मा.उच्च न्यायालयातील याचिका क्र.४०९५/२०११ मध्ये दिनांक १०.४.२०१२ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशाप्रमाणे बंदी असताना वृक्षतोड झाल्याप्रकरणी विभागीय वन अधिकारी (दक्षता), कोल्हापूर यांचे मार्फत चौकशी करण्यात येत आहे.

---

**कुडाळ तालुक्यातील (जि. सिंधुदुर्ग) रस्ते फलक बसविण्याचे काम न करता त्यांची देयके काढण्यात आल्याबाबत**

**(४०) ३६७५ (२२-१२-२०१४). श्री. वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ तालुक्यातील (जि. सिंधुदुर्ग) रस्ते फलक बसविण्याचे काम न करता त्यांची देयके काढण्यात आली असून या कामात सुमारे ३० लाखांचा भ्रष्टाचार झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०२-२०१५) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालोंड मालडी (ता.मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग) को.प.बंधारा (पाणवठा) जलसंधारण खात्याकडे योजना हस्तांतरीत करणेबाबतची कार्यवाही**

**(४१) ३६७७ (२२-१२-२०१४). श्री. वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालोंड मालडी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) को.प.बंधारा (पाणवठा) जलसंधारण खात्याकडे योजना हस्तांतरीत करणेबाबतची कार्यवाही शासन स्तरावर पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, उक्त हस्तांतरितची कार्यवाहीस विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त कार्यवाही कधीपर्यंत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०३-२०१५) :** (१) होय,

मालोंड व मालडी येथील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-यासाठी असलेल्या मागणीच्या अनुषंगाने या कामाचे अंदाजपत्रक जलसंपदा विभागामार्फत असलेल्या कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांनी दिनांक १६ मार्च, २०११ रोजी २४७ हेक्टर करीता प्रशासकीय मान्यतेस्तव सादर केले. योजनेची सिंचन क्षमता २५० हेक्टरपेक्षा कमी असल्याने ही योजना महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आली.

(२) सद्यस्थितीत योजनेच्या १४५ हेक्टर सिंचन क्षमताकरीता महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडून दिनांक १२ डिसेंबर, २०१३ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. निधी उपलब्धतेनुसार पुढील काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावंतवाडी तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) आरोंदा येथे स्वतंत्र भाजीमार्केट उभारण्याबाबत**

**(४२) ३६८१ (२२-१२-२०१४). श्री. वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) आरोंदा येथे स्वतंत्र भाजीमार्केट होण्याबाबत अनेक वर्षापासून स्थानिक ग्रामस्थांनी तसेच लोकप्रतिनिधी संबंधित विभागाकडे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोंदा येथे शनिवारी आठवडा बाजार भरविला जातो परंतु भाजी मार्केटसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध नसल्याने पावसाळ्यात मंदिरानजिकच्या रस्त्यावर भाजी विक्रेत्ते बसत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त भाजी विक्रेत्याकडून ग्रामपंचायतीमार्फत कर गोळा केला जात असतांनाही मार्केटसाठी स्वतंत्र जागा उपलबध करुन देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन उक्त मार्केटसाठी स्वतंत्र जागा उपलबध करुन देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०२-२०१५) :** (१) असे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) ते (५) मौ. आरोंदा ग्रामपंचायत हद्दीमध्ये दर शनिवारी सकाळी नऊ ते दुपारी दोन या वेळेत आठवडा बाजार भरविला जातो. सदर बाजाराचे वेळी स्वतंत्रपणे भाजीमार्केटचा बाजार भरत नाही. काही वेळा पावसाळ्यात मंदिरानजिकच्या रस्त्यावर भाजीविक्रेते बसतात ही वस्तुस्थिती आहे.

उक्त भाजी विक्रेत्यांकडून ग्रामपंचायतीमार्फत वसूल करण्यात येत असलेला कर हा अल्प असुन या उत्पन्नातून बाजाराच्या ठिकाणाची स्वच्छता व साफसफाई केली जाते. तसेच, ग्रामपंचायतीमार्फत पाणीसुविधा आणि शौचालयाची व्यवस्था करण्यात येते. मार्केटसाठी ग्रामपंचायतीची किंवा शासनाची स्वतंत्र जागा उपलब्ध नाही. खाजगी जमिनी प्रयत्न करुनही भाजी मार्केटसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध झालेली नाही.

---

**राज्यात महाराष्ट्र वीज मंडळामध्ये कामगारांच्या जागा रिक्त असल्याबाबत**

**(४३) ३७१३ (१५-०१-२०१५). श्री. अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र वीज महामंडळामध्ये हजारो कामगारांच्या जागा रिक्त असताना कामगार भरती केली जात नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वर्षापासून वीज मंडळामध्ये रोजंदारी/ठेकेदारी पध्दतीने कामगार काम करतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोजंदारी/ठेकेदारी पध्दतीने काम करणा-या कामगारांना वीज मंडळामध्ये कायम करण्यासाठी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-०३-२०१५) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कन्नड तालुक्यात (जि.औरंगाबाद) रेशनच्या धान्याचा**
**काळा बाजार मोठ्या प्रमाणावर होत असल्याबाबत**

**(४४) ३७३६ (१५-०१-२०१५). श्री. हर्षवर्धन जाधव (कन्नड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कन्नड तालुक्यात (जि.औरंगाबाद) रेशनच्या धान्याचा काळा बाजार मोठ्या प्रमाणावर होत असल्याने संबंधित दुकानदारांचे परवाने रद्द करुन ते गरजू महिला बचत गटांना देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ रोजी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१२-०२-२०१५) :** (१) होय,
(२) सदर प्रकरणी तहसीलदार, कन्नड यांच्यामार्फत नियुक्त तपासणी पथकाने दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी मौ.कोळवाडी, मोहर्डा, सारोळा येथील रास्तभाव दुकानांची तपासणी केली असता, संबंधित रास्तभाव दुकानामध्ये किरकोळ स्वरुपाचे दोष आढळून आले, त्या रास्तभाव दुकानांची अनामत रक्कम जप्त करण्याची कार्यवाही चालू आहे. तालुक्यातील उर्वरीत रास्तभाव दुकानाची तपासणी करण्याची कार्यवाही तपासणी पथकाद्वारे करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवगड तालूक्यातील आनंदवाडी मत्स्यव्यवसाय बंदर विकास**
**उभारण्याच्या कामास झालेल्या दिरंगाई बाबत**

**(४५) ३७४० (२७-०१-२०१५). श्री. शरददादा सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवगड तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) आनंदवाडी येथे सुसज्ज व अद्ययावत मत्स्यव्यवसाय बंदर विकसीत करण्याचे शासनाने ७ व्या पंचवार्षिक योजनेत निश्चित केले असून सदरहू बंदराचे काम १० व्या पंचवार्षिक योजने अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे योजिलेले असून या

बंदराच्या कामास २००४ मध्ये प्रथम प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर दिनांक १० नोव्हेंबर, २००० रोजी रुपये ११.३४ कोटी एवढया रक्कमेच्या कामास सुरुवात झाली असून पहिल्या टप्प्याच्या सुमारे ४१० मीटरचे भरावाचे काम ५.१७ कोटी रुपये खर्च करुन पूर्ण करण्यात आल्यानंतर स्थानिक मच्छिमारांनी कामास विरोध केल्यामुळे दिनांक ८ मे, २००८ पासूर सदर काम अर्धवट स्थितीत बंद पडलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) स्थानिक मच्छिमारांनी विरोध दर्शवल्यानंतर त्यांनी केलेल्या सूचनेनुसार शासनाने सदरहू प्रकल्पाचे काम ५०० मीटर दक्षिणकडे सरकवून त्याप्रमाणे सुधारित Alternative Layout II तयार करुन सुधारित रुपये ९२.५० कोटी इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक व आराखडे मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाग विभाग यांनी शासनाच्या प्रशासकीय व वित्तीय मंजूरीसाठी दिनांक २० ऑगस्ट, २०१४ पूर्वी सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावास राज्य शासनाची प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यातआली आहे काय,

(४) अद्यापी सदरहू सुधारित प्रस्तावास शासनाची प्रशासकीय व वित्तीय मंजूरी न मिळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) आनंदवाडी मत्स्यव्यवसाय बंदर विकास करण्याचे शासनाने ७ व्या पंचवार्षिक योजनेत (१९८६) निश्चित केल्यानंतर सदरहू मत्स्यव्यवसाय बंद उभारण्याच्या कामास झालेली अक्षम्य दिरंगाई विचारात घेता सदरहू काम लवकरात लवकर हाती घेऊन पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस कारवाई केली आहे वा करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-०१-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर कामाचा आराखडा बदलल्याने सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) सदर काम सन २००४-०५ यावर्षी नियोजनात समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार प्रत्यक्ष काम सन २००७ मध्ये सुरु करण्यात आले. परंतु गावक-यांनी काम बंद पाडल्यामुळे काम पूर्ण होऊ शकले नाही. आता स्थानिक गावक-यांच्या सहमतीने सुधारीत आराखड्यास मान्यता दिली असून सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी व हिंगोली जिल्हयाच्या सिंचनाच्या अनुशेषाबाबत**

**(४६) ३७४४ (२३-१२-२०१४). श्री. तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयाचे विभाजन होऊन हिंगोली जिल्हयाची निर्मिती झाल्यानंतरही अद्यापर्यंत हिंगोली जिल्हयाचा सिंचनाचा अनुशेष वेगळा न करता परभणी व हिंगोली जिल्हयाचा सिंचनाचा अनुशेष एकत्र काढला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्याचा स्वतंत्रपणे अनुशेष काढून तसेच तो दूर करण्याकरिता जिल्ह्यात सिंचनाचे क्षेत्र वाढविण्याकरिता शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-०२-२०१५) :** (१) व (२) सद्यस्थिती निर्देशांक व अनुशेष समितीने परिगणित केलेल्या अनुशेष निर्मूलनाची कार्यवाही सुरु आहे. निर्देशांक व अनुशेष समितीने १९९४ च्या पातळीवरील तत्कालीन ३० जिल्ह्याचा पाटबंधारे विकास क्षेत्रातील अनुशेष परिगणित केला होता. अविभाजित परभणी जिल्ह्यात अनुशेष नव्हता.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) पाणी टंचाई दूर करणेबाबत**

**(४७) ३७५० (१५-०१-२०१५). श्री. पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) येथील धरणातून मुंबई शहराला पुरेसा पाणीपुरवठा होत आहे, तथापि शहापूर तालुक्यातील जनतेला तीव्र पाणी टंचाई असल्याचे निवेदन मा. पाणीपुरवठा मंत्री, सचिव पाणीपुरवठा स्वच्छता विभाग यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. २५ नोव्हेंबर, २०१४ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शहापूर तालुक्याची पाणी टंचाई दूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१०-०३-२०१५) :** (१) व (२) हे खरे आहे.
निवेदनानुसार पाणी टंचाई दूर करण्यासाठी पाणी टंचाई गाव/पाड्यांचा आराखडा सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-नाशिक महामार्गावरील चौपदरीकरणातील अनेक कामे अपूर्ण असून सुध्दा पडघा घोटी येथे टोलनाके सुरु करण्यात आलेबाबत**

**(४८) ३७५१ (२२-१२-२०१४). श्री. पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-नाशिक महामार्गावरील चौपदरीकरणातील अनेक कामे अपूर्ण असून सुध्दा पडघा घोटी येथे टोलनाके सुरु करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच शहापूर तालुक्यातील वाशाळा फाटा, लाहे फाटा, कानविंदे फाटा, आसनगांव, तळवली व खडवली फाटा येथे उड्डान पूल मंजूर असताना ठेकेदाराने पूलाचे कामे न करता फक्त क्रॉसिंग ठेवले असल्यामुळे तेथे अपघाताचे प्रमाण वाढल्यामुळे त्यात अनेक व्यक्ती मृत्युमुखी पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार आधी उड्डान पूल बांधून नंतर टोल वसुली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच जव्हारफाटा ते लतिफवाडी दरम्यान मोखाडाकडून येणारी वाहतूक ही एकेरी मार्गावर उलट दिशेने यावे लागते, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१५) :** (१) नाही.

(२) सवलत करारनाम्यानुसार सदर ठिकाणी उड्डाण पूल, पादचारी किंवा वाहतुक मार्गाची तरतूद नव्हती. सदर ठिकाणी अतिरिक्त रस्ता करण्याकरीता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, मुख्यालय नवी दिल्ली यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) होय.

चौपदरीकरण करताना मुंबई कडे जाण्यासाठी २ मार्गिका आणि कसारा घाटातून नाशिककडे जाण्यासाठी एकेरी मार्गिका भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत बांधण्यात आलेली आहे.

जव्हार फाट्याकडून येणाऱ्या लोकांना मुंबई कडे जाण्यासाठी १२ कि.मी. ओलांडून जावे लागते. त्यामुळे मुंबई कडे जाण्यासाइी जुन्या कसारा घाटाचा वापर चुकीच्या दिशेने करण्यात येतो. अपघात टाळण्यासाठी भारतीय राष्ट्रीय राजमर्ग प्राधिकरण, मुख्यालय नवी दिल्ली यांचेकडे पर्यायी रस्त्याचे संरेखन करण्यासाठी सल्लागार नेमण्यासाठीचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, व सदर प्रस्ताव मान्यतेसाठी प्रतिक्षाधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचा-यांना सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(४९) ३७६४ (२३-१२-२०१४). श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचा-यांना सेवेत विना अट सामावून घेण्याबाबतचे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाने माहे ऑगस्ट, २०१४ च्या पहिल्या सप्ताहात दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंगाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ऊसतोड कामगारांच्या मजूरीत वाढ करणेबाबत**

**(५०) ३७६६ (२३-१२-२०१४). श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ऊसतोडणी कामगारांची सर्वाधिक संख्या बीड जिल्ह्यात असून साखर कारखाने सुरू झाल्याने तेथील सुमारे ६ लाख मजूर इतरत्र स्थलांतर होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच तेथील ऊसतोड मजूराला किती मजूरी देण्यात येते,
(३) या मजूरीत वाढ करण्याची शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०२-२०१५) :** (१) राज्यातील ऊसतोडणी कामगारांची सर्वाधिक संख्या बीड जिल्ह्यात असून तेथील कामगार ऊस तोडणी कामासाठी स्थलांतरीत होत आहेत.
(२) दि. ७/१०/२०११ रोजी ऊस तोडणी व वाहतूक मजूर संघटनेशी झालेलया करारानुसार ऊस तोड मजूराला प्रति मे.टन रु.१६५३२ मजूरी, तसेच त्या रकमेवर मुकादम कमिशन १८% व इतर सोयी सवलत-पशुवैद्‌यकीय दवाखाना, साखर शाळा, झोपडी इत्यादी देण्यात येतात.
(३) नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.